संदर्भित पत्रान्वये कोरेगांव नगरपंचायत मधील सातारा-पंढरपूर रस्त्याच्या उत्तरेस तीळगंगा नदीच्या पूर्वेकडील काठावर ३०० मी. व पश्चिमेकडील काठावर ३५० मी. संरक्षक भित बांधणे.संरक्षक भिंतीलगत नदीच्या बाहेरच्या बाजूला Cobble Stone Paving करून फूटपाथ बांधणे. सदर फूटपाथचे सुशोभिकरण व मंजूर विकास योजना, कोरेगांव मधील आ.क्र.०८-गार्डन या जागेचे Land Scaping & Gardening करणे, इलेक्ट्रीक पोलचे स्थलांतर करून संरक्षक भिंतीच्या बाहेर बसविणे व साऊंड सिस्टिम बसविणे या कामाचे स्थान प्रारूप विकास योजना, कोरेगांव (प.सु.) मध्ये दर्शवून रेखा नकाशे मंजूरीस्तव या कार्यालयास सादर केलेले आहेत.

शासन, नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. धोरण-२०१७/प्र.क्र.-१७१/नवि-१६, दि.१७/११/२०१७ अन्वये महाराष्ट्र राज्यातील नगरपंचायतीसाठी लागू असलेल्या "वैशिष्टयपुर्ण" योजनेचे निकष व सुधारित मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत. त्यानुसार प्रस्तुतच्या प्रस्तावातील बांधकामे ही शहराच्या

NOTARY V.L.SHINDE AREA KOREGAON Dist.SATARA R.No.7767 Govt. of India



Scanned with CamScanner

विकास आराखडा व विकास नियमावली तसेच प्रचलित नियमांशी सुसंगत असल्याची खात्री करणे अभिप्रेत असुन त्यानुषंगाने नगर रचना कार्यालयाचे प्रमाणपत्र घेणे अभिप्रेत आहे.

तद्वतच केवळ सुसंगततेनुषंगाने या कार्यालयाकडून कार्यवाही अपेक्षित असल्याने प्राप्त कागदपत्रांची व नकाशांची, मंजूर विकास योजना, कोरेगांव व प्रारूप विकास योजना, कोरेगांव (प.सु.) नुसार या कार्यालयाकडून छाननी केली असता प्रस्तावाखालील कामांच्या जागांवर खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे मंजूर विकास योजना, कोरेगांव व प्रारूप विकास योजना, कोरेगांव (प.सु.) नुसार प्रस्ताव आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | वि.यो. नुसार प्रस्ताव | मंजूर विकास योजनेमधील जमीन वापर प्रस्तावानुसार प्रस्ताव सुसंगत आहे किंवा कसे ? |
|---|---|---|---|
| १. | कोरेगांव नगरपंचायत मधील सातारा-पंढरपूर रस्त्याच्या उत्तरेस तीळगंगा नदीच्या पूर्वेकडील काठावर ३०० मी. व पश्चिमेकडील काठावर ३५० मी. संरक्षक भिंत बांधणे. संरक्षक भिंतीलगत नदीच्या बाहेरच्या बाजूला Cobble Stone Paving करून फूटपाथ बांधणे. सदर फूटपाथचे सुशोभिकरण व मंजूर विकास योजना, कोरेगांव मधील आ.क्र.०८-गार्डन या जागेचे Land Scaping & Gardening करणे, इलेक्ट्रीक पोलचे स्थलांतर करून संरक्षक भिंतीच्या बाहेर बसविणे व साऊंड सिस्टिम बसविणे ही कामे नगर पंचायतीने सादर केलेल्या नकाशानुसार प्रस्तावित आहेत. | मंजूर विकास योजना कोरेगांव नुसार सदर कामांची जागा नदी काठालगत, रहिवास विभाग, शेती विभाग व आ.क्र.०८ बगीचा मधील आहे.<br>प्रारूप विकास योजना कोरेगांव नुसार सदर कामांची जागा नदी काठालगत, हरित पट्टयात, रहिवास व सार्वजनिक, निम सार्वजनिक विभागात आहेत. | सुसंगत आहे. |

उक्त प्रस्तावित विकास कामांनुषंगाने उपरोक्त सुसंगतता प्रमाणपत्र हे खाली नमूद सर्वसाधारण अटींसापेक्ष व या कार्यालयास आपणांकडून उपलब्ध करुन दिलेल्या माहितीस अनुसरुन असले तरी प्रत्यक्षतः प्रस्तावित कामांचे स्थानमान, नगरपंचायतीची मालकी, कामांचा दर्जा, कामांचे परिमाण, अस्तित्वातील विकास, अस्तित्वातील कामांचा दर्जा, अस्तित्वातील कामांचा दर्जानुरुप खरोखर आवश्यकता तसेच इतर तांत्रिक व प्रशासकिय बाबींची पुर्तता या सर्वच बाबींवर त्याचप्रमाणे विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस अनुसरुन आपल्या नगरपंचायतीच्या तांत्रिक अधिका-यांसह सक्षम अधिकारी/ प्राधिकारी / सल्लागार यांचेकडुन प्रथमतः अभिप्राय घेणे अत्यावश्यक आहेत.

सर्वसाधारण अटी :-

१. वैशिष्ट्पुर्ण योजनेअंतर्गत उक्त नमूद विकास कामे हाती घेण्यापुर्वी शासनाकडील अधिसूचना / सूचना/ परिपत्रक / निर्णय इत्यादीमधील दिलेल्या सर्व मार्गदर्शक सुचनांप्रमाणे प्रस्तुतचे विकास कार्य अनुज्ञेय होते किंवा कसे, याबाबतची रितसर खात्री आपणांकडुन प्रथमतः करणे आवश्यक राहील.





Scanned with CamScanner

२. प्रत्यक्ष जागेवर उक्त नमुद काम कार्यान्वित करणेपुर्वी अशा कामास सक्षम तांत्रिक सल्लागाराच्या सल्लामसलतीने व त्यांचेकडून प्राप्त वेळोवेळीच्या सल्ल्यानुसार मान्यता घेऊन व संबंधित विभागाची नाहरकत घेऊन तद्नंतर कार्यान्वित करणे कोरेगांव नगरपंचायतीवर बंधनकारक राहील.

३. प्रस्तुत रेखा नकाशास मंजूर प्रादेशिक योजनेच्या वापर विभागाच्या प्रस्तावाच्या तसेच मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियमांच्या पूर्ततेसापेक्ष सुसंगत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

४. प्रस्तुत प्रस्तावांतर्गतच्या बांधकामात समाविष्ट असलेली संपूर्ण जागा प्रत्यक्षात कोरेगांव नगरपंचायतीच्या ताब्यात असल्याशिवाय काम हाती घेवू नये.

५. प्रत्यक्ष जागेवर अतिक्रमण असल्यास अतिक्रमण प्रत्यक्षतः निष्कासित करुन संपूर्ण जागा ताब्यात असल्याची खात्री करुनच कोरेगांव नगरपंचायतीकडून बांधकाम हाती घेण्यात यावे.

६. विषयांकित प्रकरणाची छाननी प्रस्तावासोबत उपलब्ध असणा-या कागदपत्रांच्या आधारे केलेली आहे. या कागदपत्रांच्या अधिकृततेबाबत व अद्यावत नोंदीबाबत आपले स्तरावर खात्री करण्यात यावी.

७. प्रस्तुत प्रस्तावांतर्गत प्रत्यक्षतः करावयाचे विकसन हे कोरेगांव नगरपंचायतीकडील तांत्रिक अधिकारी/ अभियंता / वास्तुविशारद / सक्षम तांत्रिक सल्लागार यांचे देखरेखीखाली करणे अभिप्रेत व आवश्यक राहील.

८. यापुर्वी इतर कोणत्याही योजनेतुन उक्त काम प्रस्तावित नसल्याची खातरजमा प्रथमतः करण्यात यावी.

९. प्रस्तावाखालील जागेची मालकी कोरेगांव नगरपंचायतीचीच आहे, याबाबत आपण खात्री करावी व पुढील कार्यवाही करावी.

१०. आजुबाजूचे वहीवाटीला बाधा होणार नाही, याची दक्षता कोरेगांव नगरपंचायतीने घेणे बंधनकारक राहील.

रेखा नकाशाची एक प्रत तसेच सोबत सादर केलेली आवश्यक कागदपत्रे/ नकाशे या कार्यालयाचे अभिलेखार्थ ठेवण्यात येत आहेत.

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

मसुदा मा.स.सं.न.र. यांनी मंजूर केला असे

(सतीश चाणी)
नगर रचनाकार
सहायक संचालक, नगर रचना,
सातारा यांचे कार्यालय

NOTARY
V.L.SHINDE
AREA
KOREGAON
DIST. SATARA
R.No.7767
Govt. Of. India

प्रत :- मा.जिल्हाधिकारी, सातारा यांना माहितीस्तव सविनय सादर.

९६

D:\...\योजना कोरेगाव.docx

Scanned with CamScanner

Annexure VI

वाचा :-

१) महाराष्ट्र शासन, नगर विकास, विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-धोरण-२०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६ दि:१७/११/२०१७

२) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक- नपावै-२०२३/प्र.क्र.३२८(८८)(१)/नवि-१६ दि.१७/०७/२०२३, (लेखाशिर्ष ४२१७ ०६०३)

३) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक- नपावै-२०२३/प्र.क्र.५७०(२)/नवि-१६ दि.२६/०७/२०२३, (लेखाशिर्ष २२१७ १३०१)

४) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक- नपावै-२०२३/प्र.क्र.५८३(ड)/नवि-१६ दि.३०/०८/२०२३ (लेखाशिर्ष ४२१७ ०६०३)

५) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक- नपावै-२०२३/प्र.क्र.६४६(४)/नवि-१६ दि.११/१०/२०२३ (लेखाशिर्ष ४२१७ ०६०३)

६) मुख्याधिकारी, कोरेगाव नगरपंचायत, कोरेगाव यांचेकडील पत्र जा.क्र.कोनपं/बांवि/१५५८/२०२३ दि.१२/१०/२०२३

७) कोरेगाव नगरपंचायत, कोरेगाव यांचेकडील सर्वसाधारण सभा ठराव क्र.१९ दि.०८/०६/२०२३

८) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे प्रादेशिक विभाग पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.मु.अ.(पुणे)/तां.शा २/ कोरेगाव न.पं./तीळगंगा नदी सुशोभीकरण/२४४०/२०२३ दि.०९/१०/२०२३

९) सहायक संचालक, नगररचना, सातारा यांचेकडील पत्र क्र.वैशिष्ट्यपूर्ण योजना/कोरेगाव न.पं./ससंसा/३१३१ दि.२०/१०/२०२३

---

जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

क्र.साशा/नपा/(वै.यो.वि.अ.)/कोरेगाव
नपं/एसआर/ ५० /२०२३
दि.२६/१०/२०२३

विषय :- कोरेगाव नगरपंचायत, कोरेगाव
वैशिष्टयपूर्ण योजने अंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत प्राप्त अनुदानातून प्रस्तावित केलेल्या कामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.
(लेखाशिर्ष ४२१७ ०६०३) व (लेखाशिर्ष २२१७ १३०१)

NOTARY V.L.SHINDE AREA KOREGAON Dist.SATARA R.No.7767 Govt. of India

**आदेश**

ज्याअर्थी, वैशिष्टयपूर्ण योजनेअंतर्गत उपरोक्त वाचा क्र.२ ते ५ महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक- नपावै-२०२३/प्र.क्र.३२८(८८)(१)/नवि-१६ दि.१७/०७/२०२३ (लेखाशिर्ष ४२१७ ०६०३), शासन निर्णय क्रमांक- नपावै-२०२३/प्र.क्र.५७०(२)/नवि-१६ दि.२६/०७/२०२३ (लेखाशिर्ष २२१७ १३०१), शासन निर्णय क्रमांक- नपावै-२०२३/प्र.क्र.५८३(ड)/नवि-१६ दि.३०/०८/२०२३ (लेखाशिर्ष ४२१७ ०६०३) व शासन निर्णय क्रमांक- नपावै-२०२३/प्र.क्र.६४६(४)/नवि-१६ दि.११/१०/२०२३ (लेखाशिर्ष ४२१७ ०६०३) अन्वये कोरेगाव नगरपंचायतीस वैशिष्टयपूर्ण योजने अंतर्गत लेखाशिर्ष ४२१७ ०६०३ व लेखाशिर्ष २२१७ १३०१ अन्वये अनुक्रमे एकूण र.रु.२२,७०,००,०००/- इतका निधी शासनस्तरावरून मंजूर करणेत आलेला आहे. सदर शासनस्तरावर मंजूर निधीपैकी र.रु.२०,७०,००,०००/- इतक्या मंजूर निधीचे काम प्रस्तावित केलेले आहे. त्यानुसार मुख्याधिकारी, कोरेगाव नगरपंचायत, कोरेगाव यांनी र.रु.२८,०३,६३,९८३/- इतक्या अंदाजपत्रकीय रक्कमेचा प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

व तसेच ज्याअर्थी, उपरोक्त प्रस्तावित कामास वाचा क्र. ७ कोरेगाव नगरपंचायत, कोरेगाव यांचेकडील सर्वसाधारण सभा ठराव क्र.१९ दि.०८/०६/२०२३ अन्वये प्रस्तावित कामास नगरपंचायतीने मान्यता दिलेली आहे, वाचा क्र.८ मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे प्रादेशिक विभाग पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.मु.अ.(पुणे)/तां.शा २/कोरेगाव न.पं./तीळगंगा नदी सुशोभीकरण/२४४०/२०२३ दि.०९/१०/२०२३ अन्वये प्रस्तावित कामास तांत्रिक मान्यता देणेत आलेली आहे. तसेच प्रस्तावित काम विकास आराखडा व विकास नियमावलीशी सुसंगत असल्याचे प्रमाणपत्र मुख्याधिकारी, कोरेगाव नगरपंचायत व सहायक संचालक, नगररचना, सातारा यांनी सादर केलेली आहेत. त्यानुसार कोरेगाव नगरपंचायतीने प्रस्तावित केलेल्या कामाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे

Scanned with CamScanner

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | प्रशासकीय मंजूरी रक्कम रुपये | | वाचा क्र.२ ते ५ अन्वये मंजूर शासन अनुदानाव्यतिरिक्त नगरपंचायतीस भरावयाची अतिरिक्त रक्कम (७-५) | एकूण प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वाचा क्र.२ ते ५ अन्वये मंजूर शासन अनुदान (१००%) | वाचा क्र.२ ते ५ अन्वये मंजूर अनुदानापैकी प्रस्तावित केलेल्या कामांची रक्कम | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | कोरेगाव नगरपंचायत मधील तीळगंगा नदी परिसर संरक्षक भित, सुशोभीकरण, ट्रिमिक्स कॉंक्रिटीकरण, सभामंडप बांधकाम, बागकाम, इलेक्ट्रिक पोल शिफ्टिंग करणे व दगडी पेव्हर्स, साऊंड सिस्टीम बसविणे. | २८,०३,६३,१८३/- | २२,७०,००,०००/- | २०,७०,००,०००/- | ७,३३,६३,१८३/- | २८,०३,६३,१८३/- |
| | एकूण रक्कम रुपये | २८,०३,६३,१८३/- | २२,७०,००,०००/- | २२,७०,००,०००/- | ७,३३,६३,१८३/- | २८,०३,६३,१८३/- |

त्याअर्थी, मी, जिल्हाधिकारी, सातारा याद्वारे कोरेगाव नगरपंचायत, कोरेगाव यांनी सादर केलेल्या वरील प्रस्तावित कामास एकूण र.रु. २८,०३,६३,१८३/- (अक्षरी अठ्ठावीस कोटी तीन लक्ष त्रेसष्ट हजार एकशे त्र्याऐंशी रुपये फक्त) च्या कामांना पुढील अटी / शर्तीस अधीन राहून वैशिष्टयपूर्ण योजनेतून (लेखाशिर्ष ४२१७ ०६०३) व (लेखाशिर्ष २२१७ १३०१) खर्च करणे खालील अटी / शर्तीस अधीन राहून प्रशासकीय मान्यता देत आहे.

**अटी/शर्ती**

१) महाराष्ट्र शासन, नगर विकास, विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. निर्णय धोरण-२०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६ दि.१७/११/२०१७ व शासन निर्णय क्र.-नपावै-२०१७/ प्र. क्र. १४८(७५)/ नवि-१६ दि.०३/१०/२०१८ यामध्ये व तसेच या योजनेकरिता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीमध्ये नमूद केलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे नगरपंचायतीस बंधनकारक राहील.

२) वरील प्रस्तावित कामाकरिता अद्याप शासनस्तरावरून निधी अप्राप्त आहे व सदर निधी प्राप्त करून घेणेची जबाबदारी संबंधित नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व नगरपंचायतीची राहील. सदर निधी शासनाकडून प्राप्त झाला नाही तर नगरपंचायत निधीतून सदर कामे करावी लागतील. याबाबत या कार्यालयाकडून स्वतंत्र अनुदान मंजूर केले जाणार नाही. याव्यतिरिक्त प्रस्तावित कामाकरिता नगरपंचायतीस शासनस्तरावरून निधी मंजूर झालेस या कार्यालयाची स्वतंत्र प्रशासकीय मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

३) वरील प्रस्तावित कामास दिलेल्या प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त खर्च असल्यास तो नगरपंचायत फंडातून खर्च करावयाचा आहे. याबाबतची संपूर्ण जबाबदारी नगरपंचायत व मुख्याधिकारी यांची राहील.

४) एकाच कामासाठी दुहेरी खर्च होणार नाही याची जबाबदारी मुख्याधिकारी यांची राहील.

५) उपरोक्त निधीचे विनियोग प्रमाणपत्र विहीत नमुन्यात न.पा.प्रशासन संचालनालय, मुंबई यांना सादर करुन त्याची प्रत या कार्यालयास पाठवावी.

६) प्रस्तावित योजनेच्या कालावधीत अंदाजपत्रकीय कोणताही बदल झाल्यास किंवा इतर कारणाने अंदाजपत्रकीय रक्कम वाढल्यास त्याची जबाबदारी नगरपरिषदेची राहील. योजना बंद झाल्यास किंवा इतर कारणामुळे शासनाकडून पुढे निधी प्राप्त न झाल्यास उर्वरित निधीची तरतूद करण्याची जबाबदारी नगरपरिषदेची राहील.

७) या योजनांतर्गत हाती घेतलेल्या कामांची भविष्यात दुरुस्ती व देखभाल याचा खर्च नगरपरिषदेने आपल्या निधीतून करावा या योजनेच्या प्राप्त अनुदानामधून कोणत्याही परिस्थितीत देखभाल किंवा दुरुस्तीसाठी वापरु नये.

८) कामात अनियमितता झालेस किंवा नगरपंचायत ठराव, जागा, तांत्रिक बाबी किंवा इतर कारणांमुळे कोणताही वाद अथवा तक्रार निर्माण झाल्यास किंवा प्रस्तावित कामाबाबत निविदा प्रकिया, न्यायालयीन वाद निर्माण झालेस याबाबत

...WebTenderStatus&service=direct&session=1&sp=SQsaL3FrUXinMyl 2/3

Scanned with CamScanner

सर्वस्वी मुख्याधिकारी व नगरपंचायत यांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी तसेच तांत्रिक मान्यतेतील अटी व शर्ती नगरपरिषदेवर बंधनकारक राहील.

९) या योजनेतून हाती घेतलेली मंजूर कामे विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसारच होतील याची खबरदारी घ्यावी. यामध्ये कोणत्याही प्रकारे अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी याबाबतची संपूर्ण जबाबदारी मुख्याधिकारी, नगरपंचायत यांची राहील.

१०) प्रस्तावित कामाचे सक्षम प्राधिकारी यांचेकडून कामाची गुणवत्ता तपासणी करणे बंधनकारक राहील. तसेच शासन निर्णय दि.२८/०३/२०१८ नुसार आवश्यक येथे सदर कामांचे त्रयस्थ पक्षामार्फत तांत्रिक लेखापरिक्षण करणे आवश्यक राहील.

११) शासनाच्या ज्या आदेशाद्वारे तसेच ज्या शासन निर्णयाच्या अंतर्गत नगरपंचायतीस अनुदान प्राप्त झालेले आहे, त्यातील सर्व अटी/शर्ती, तांत्रिक मंजूरी देणा-या समक्ष प्राधिकारी यांनी नमूद केलेल्या अटी/शर्ती या सर्व बाबीचे पालन करणेची जबाबदारी मुख्याधिकारी यांची राहील.

१२) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय दि.२७/०९/२०१८ व तसेच नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.०८/०७/२०२१ नुसार ई-निविदा करणे बंधनकारक आहे. तसेच सदर शासन निर्णयातील तसेच शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे नगरपंचायतीवर बंधनकारक राहील. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या ई-निविदा अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास,अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही. तसेच ई-निविदा अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. याबाबतची सर्व जबाबदारी कार्यन्वयिन यंत्रणेची राहील.

१३) निधी खर्च करताना तो विहित कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहित प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग व वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेचा (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठल्याशी शासन नियम / अधिकाराचा भंग होणार नाही याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित नगरपंचायत मुख्याधिकारी यांची राहील.

१४) वरील प्रस्तावित कामाच्या अनुषंगाने सहायक संचालक, नगर रचना विभाग, सातारा यांचेकडून आवश्यक असल्यास प्रस्तावित काम संबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखड्याशी सुसंगत असल्याचे प्रमाणपत्र घेऊनच काम सुरु करणेत यावे याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित मुख्याधिकारी यांची राहील.

१५) प्रस्तावित कामाची अंमलबजावणी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतूदी व संचालनालयाकडील स्थायी निदेशातील सूचनेप्रमाणे करावी.

१६) वरील प्रस्तावित कामांसाठी यापूर्वी कोणत्याही इतर अनुदानातून किंवा नगरपंचायत फंडातून खर्च केलेल्या नसल्याबाबतची खात्री करणेत यावी. याबाबतची संपूर्ण जबाबदारी मुख्याधिकारी, नगरपंचायत यांची राहील..

१७) तसेच यापूर्वी आपणास वितरीत करणेत आलेल्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे या कार्यालयास तात्काळ सादर करणेत यावे व तसेच वरील प्रस्तावित काम हे शासनाने दिलेल्या विहित मुदतीत निधी खर्च करणेत यावे.

(जितेंद्र डूडी)
जिल्हाधिकारी, सातारा

NOTARY V. SHINDE AREA KOREGAON DIST. SATARA R.No.7767 Govt. Of. India

प्रति,

मुख्याधिकारी, कोरेगाव नगरपंचायत, कोरेगाव

प्रत सविनय सादर -

१) मा. सहसचिव, नगर विकास, विभाग, (नवि १६), मंत्रालय, मुंबई-३२

२) मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-३०

जिल्हाधिकारी,साताराकरिता

Scanned with CamScanner

राज्यातील नगरपरिषदांसाठी लागू असलेल्या "वैशिष्ट्यपूर्ण" योजनेचे निकष व सुधारीत मार्गदर्शक तत्वे निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक-धोरण-२०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १७ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :-(१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. संकीर्ण-१०२०००/प्र.क्र.४०/२०००/नवि-४, दिनांक २५ फेब्रुवारी,२०००.
(२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. जीईएन-२००७/८७३/नवि-१६, दिनांक १६ फेब्रुवारी,२००८ व दिनांक ६ सप्टेंबर,२०१३.
(३) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. जीईएन-२००७/८७३/नवि-१६, दिनांक ६ सप्टेंबर,२०१३.

NOTARY V.L.SHINDE AREA KOREGAON Dist.SATARA R.No.7767 Govt.Of.India

**प्रस्तावना -**

राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे निकष संदर्भाधीन क्रमांक (१) ,(२) व (३) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत.संदर्भाधीन क्र. (१), (२) व (३) येथील शासन निर्णय अधिक्रमित करून सदर योजनेचे सुधारीत निकष व मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

राज्यातील नगरपरिषदांसाठी लागू असलेल्या "वैशिष्ट्यपूर्ण" या योजनेची खालील सुधारीत मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यास या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात येत आहे.

२. **सदर योजनेअंतर्गत अनुदानास पात्र नागरी स्थानिक स्वराज्य संस्था :-**

राज्यातील अस्तित्वातील सर्व नगरपरिषदा "वैशिष्ट्यपूर्ण" या योजनेअंतर्गत अनुदानास पात्र राहतील.

Scanned with CamScanner

३. योजनेअंतर्गत घ्यावयाच्या कामांचे स्वरूप :-

(I) **"वैशिष्ट्यपूर्ण" योजनेअंतर्गत विभागाच्या मंजूर नियतव्ययामधून वितरीत करण्यात येणा-या निधीमधून (२२१७ १३०१)** नाविण्यपूर्ण अभिनव अशा स्वरुपाचे कामकाज नगरपरिषदेने हाती घेणे अपेक्षित असून अशा कामास प्राधान्य द्यावयाचे आहे. सदरहू काम नगरपरिषदेच्या आवश्यक व स्वेच्छाधीन कर्तव्याशी सुसंगत असणे आवश्यक आहे. सदर योजनेंतर्गत हाती घेतलेले काम सर्वसाधारणपणे भांडवली स्वरुपाचे असावे ज्यायोगे भविष्यात नगरपालिकांना आर्थिक स्वयंपुर्ण होण्यासाठी कायम स्वरुपी उत्पनाचा स्त्रोत मिळून देण्याच्या दृष्टीने फायदेशीर राहील.

(अ) <u>योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेली कामे -</u>

१. प्रशासकीय इमारत - नवीन बांधकाम, विस्तारीकरण, नुतनीकरण, फर्निचर इ. बाबी.

२.बहुपयोगी सभागृहे - सामाजिक सभागृह,समाजमंदिर,वाचनालय, अभ्यासिका, लोकसेवा केंद्र इ. समाजपयोगी बांधकामे

३.नाट्यगृह - नाट्यगृह/प्रेक्षागृह/ सांस्कृतिक केंद्र इ. चे नवीन बांधकाम /विस्तारीकरण/ नुतनीकरण या कामाच्या प्रकाराच्या अनुषंगाने संबधित नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये नाट्यगृह/सांस्कृतिक केंद्र चालण्याची व्यवहार्यता प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी तपासण्यात यावी.

४. व्यापारी संकुल - सदर योजनेअंतर्गत बांधण्यात येणा-या गाळ्यांचे बाजारभावाने मुल्य निश्चित करण्यात यावे व लिलाव पद्धतीने भाडेतत्वावर देण्यात येतील याबाबतची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.या अटीवरच या प्रयोजनासाठी निधी अनुज्ञेय राहील.

५. आठवडी बाजार - यामध्ये बाजार ओटे,भाजी मंडई, मच्छीमार्केट, मटण मार्केट,फेरीवाला क्षेत्र इ.

६.स्मशानभूमी - सर्व धर्म/समाज यांच्या स्मशानभूमी

७.हरीतपट्टे/अमृतवने - बगीचा, वृक्षारोपण, हरीतपट्टे विकसित करणे इ. हरीतपट्टे विकसित करताना शासन निर्णय दिनांक १५/०७/२०१७ मधील मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.



Scanned with CamScanner

८.क्रिडांगण - खेळाची मैदाने,जॉगिंग ट्रक,व्यायामशाळा इ.

९.पाणीपुरवठ्याच्या अत्यावश्यक सेवा - पाण्याची टाकी,जलकुंभ,पाणी मीटर, वितरण व्यवस्था, जलशुद्धीकरण याच्याशी संबधित अत्यावश्यक बाबी इ.

१०. प्रलंबित व रेंगाळलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी (Gap Funding) - केंद्र/राज्य शासनाच्या योजनेमधून हाती घेतलेले प्रकल्प कोणत्याही अपरिहार्य कारणास्तव त्या योजनेमधून निधी उपलब्ध होवू शकत नसल्यास असे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सदर योजनेमधून निधी अनुज्ञेय राहील.

**(ब) योजनेअंतर्गत अनुज्ञेय नसलेली कामे-**

१. नदी सौंदर्यीकरण/तलाव सौंदर्यीकरण करणे, संरक्षक भिंत इ. कामे ही पर्यावरण विभागाच्या योजेअंतर्गत समाविष्ट आहेत.

२.नदीमधील गाळ काढणे ही बाब जलयुक्त शिवार योजनेमध्ये समाविष्ट आहे.

३.जलतरण तलाव

४.रस्ते करीता रस्ता अनुदान देण्यात येते तसेच, नाली/गटार/मलनिस्सारणाची कामे इ. नगरोत्थानमधून प्रकल्प आराखडा बनवून मंजूर करण्यात येतात.

५.पथदिवे,हायमास्ट,एल.ई.डी. इ. बाबी ह्या EESL सोबतच्या करारनाम्याअंतर्गत समाविष्ट असल्याने

६.अभिलेख संगणकीकरण (Data Digitization) - आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचलनालय यांच्या स्तरावरून याबाबत एकत्रित कार्यवाही करण्यात येत असल्याने.

७. भू-संपादनाचा मोबदला अथवा वाढीव मोबदला

८.बंधारे बांधणे हे काम जलसंपदा विभाग करीत असल्यामुळे

**(क)** उपरोक्त (अ) मध्ये नमूद केलेल्या अनुज्ञेय कामांव्यतीरीक्त एखादे काम सदर योजनेअंतर्गत घ्यावयाचे असल्यास तसा प्रस्ताव संबधित नगरपरिषदेने जिल्हाधिकारी यांचे मार्फत शासनास सादर करावा. सदर प्रकरणी प्रशासकीय मान्यतेचे अधिकार शासनास राहतील.

NOTARY V.L.SHINDE AREA KOREGAON Dist.SATARA R.No.7767 Govt. Of. India



Scanned with CamScanner

**(II) नियोजन विभागाकडून उपलब्ध करून देण्यात येणारा अतिरीक्त नियतव्ययामधून वितरीत करण्यात येणा-या निधीमधून (४२१७ ०६०३) घ्यावयाची** कामे शासनस्तरावरून निश्चित करण्यात येतील.

**४. कामांची निवड –**

(अ) सदर योजनेअंतर्गत उपरोक्त परिच्छेद क्र. (३) मधील नमूद कामांमधून शासनस्तरावरून कामे निश्चित करण्यात येतील.

(ब) ज्या ठिकाणी शासन स्तरावरून कामे निश्चित करण्यात येणार नाहीत तिथे नगरपरिषद ठरावाद्वारे कामे निश्चित करण्यात यावीत. तथापि, व्यापक जनहित विचारात घेवून ठरावाव्यतिरीक्त अन्य काम घेण्याची शिफारस नगराध्यक्ष शासनास करू शकेल.

**५. योजनेअंतर्गत करावयाच्या कामांकरीता कार्यान्वयन यंत्रणा–**

नगरपरिषद क्षेत्रात घ्यावयाच्या कामांच्या स्वरूपानुसार व आवश्यकतेनुसार कार्यान्वयन यंत्रणा (नगरपरिषद/सार्वजनिक बांधकाम विभाग/महाराष्ट्र जीवन विकास प्राधिकरण इ.) शासनस्तरावरून निश्चित करण्यात येईल.

**६. योजनेअंतर्गत करावयाच्या कामांकरीता तांत्रिक मान्यता देणे–**

(अ) सदर योजनेअंतर्गत निश्चित करण्यात येणा-या कामांकरीता संबधित कार्यान्वयन यंत्रणेने सविस्तर प्रस्ताव बनवून तांत्रिक मान्यतेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना सादर करावा.

(ब) स्थापत्य कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा महाराष्ट्र जीवन विकास प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेण्यात यावी.

**७. योजनेअंतर्गत करावयाच्या कामांकरीता प्रशासकीय मान्यता देणे–**

**(I) "वैशिष्ट्यपूर्ण" योजनेअंतर्गत विभागाच्या मंजूर नियतव्ययामधून वितरीत करण्यात येणा-या निधीबाबत (२२१७ १३०१) –**

(अ) जिल्हाधिकारी यांनी प्रस्तावित कामाची जागा ताब्यात असल्याची खातरजमा करावी. प्रस्तावित काम विकास आराखडा व विकास नियमावली तसेच, प्रचलित नियमांशी सुसंगत असल्याची खातरजमा करावी. प्रस्तावाची सविस्तर



Scanned with CamScanner

छाननी करून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

(ब) अनुज्ञेय कामांव्यतीरीक्त एखादे काम सदर योजनेअंतर्गत घ्यावयाचे असल्यास तसा प्रस्ताव संबधित नगरपरिषदेने जिल्हाधिकारी यांचे मार्फत शासनास सादर करावा. अशा प्रकरणी प्रशासकीय मान्यतेचे अधिकार शासनास राहतील.

**(II) "वैशिष्ट्यपूर्ण" योजनेअंतर्गत नियोजन विभागाकडून मंजूर करण्यात येणा-या विशेष नियतव्ययामधून वितरीत करण्यात येणा-या निधीबाबत (४२१७ ०६०३) -**

(अ) शासनस्तरावरून कामे निश्चित करून दिल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी संबधित कार्यान्वयन यंत्रणेकडून तांत्रिक मान्यतेचा प्रस्ताव प्राप्त करून घ्यावा. प्रस्तावित कामाची जागा ताब्यात असल्याची खातरजमा करावी.प्रस्तावित काम विकास आराखडा व विकास नियमावली तसेच, प्रचलित नियमांशी सुसंगत असल्याची खातरजमा करून प्रशासकीय मान्यतेस्तव शासनास सादर करावा.

(ब) अशा प्रकरणी प्रशासकीय मान्यतेचे संपूर्ण अधिकार शासनास राहतील.

NOTARY ... SHINDE AREA KOREGAON Dist.SATARA R.No.7767 Govt. Of. India

८. **योजनेचा वित्तीय आकृतीबंध-**

(अ) "वैशिष्ट्यपूर्ण" योजनेअंतर्गत विभागाच्या मंजूर नियतव्ययामधून वितरीत करण्यात येणा-या निधीकरीता (२२१७ १३०१) वित्तीय आकृतीबंध राज्य शासन ९०% व नगरपरिषद १०% असा राहील.

(ब) ज्या प्रकरणी कार्यान्वयन यंत्रणा नगरपरिषद असेल, अशा प्रकरणी नगरपरिषदेने त्यांचा स्व:हिस्सा भरणे बंधनकारक राहील.

(क) ज्या प्रकरणी कार्यान्वयन यंत्रणा नगरपरिषद व्यतिरीक्त अन्य (सार्वजनिक बांधकाम विभाग,महाराष्ट्र जीवन विकास प्राधिकरण,जलसंपदा विभाग,जलसंधारण विभाग,विद्युत विभाग इ.) निश्चिती करण्यात येईल अशा प्रकरणीही नगरपरिषदेने वित्तीय आकृतीबंधानुसार स्व:हिस्सा (१०% हिस्सा) भरणे आवश्यक राहील.

(ड) अशा सर्व प्रकरणी आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्रे देणे नगरपरिषदेस बंधनकारक राहील.

(इ) नियोजन विभागाकडून उपलब्ध करून देण्यात येणारा अतिरीक्त नियतव्ययाच्या बाबतीत (४२१७ ०६०३) राज्य शासनाचा हिस्सा १००% राहील.



Scanned with CamScanner

## ९. योजनेअंतर्गत निधी वितरणाची कार्यपद्धत

(अ) शासनास प्राप्त झालेल्या निवेदन/प्रस्ताव यांच्या अनुषंगाने,सदर योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांकरीता नगरपरिषदनिहाय निधी मंजूर करण्यात येईल.उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद व मागणीचे प्रस्ताव विचारात घेवून आवश्यकतेनुसार नगरपरिषदांना अनुदान मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(ब) सदरचे अनुदान मंजूर करतेवेळी पुढील बाबींचा प्राधान्याने विचार करण्यात येईल,नगरपरिषदेची वित्तीय परिस्थिती, स्थानिक गरज व प्राथमिकता, पूरक विकास प्रकल्पाकरिता, भौगोलिक परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती , नागरीकरणाचा दर,) पूरक दळणवळण साधनांचा विकास, हागणदारीमुक्त व स्वच्छ शहराची निर्मिती.इत्यादी

## १०. योजनेचे कालबद्ध टप्पे -

(अ) सदर योजनेच्या कालबद्ध अंमलबजावणीकरीता पुढीलप्रमाणे टप्पे राहतील -

| अ.क्र. | बाब | कार्यवाहीचा विभाग | कालमर्यादा |
|---|---|---|---|
| १ | नगरपरिषदनिहाय निधी, कामाचे नाव व कार्यान्वयन यंत्रणा निश्चित करून निधी जिल्हाधिकारी यांना वर्ग करणे | नगर विकास | वित्तीय वर्ष |
| २ | कार्यान्वयन यंत्रणेस निधी वर्ग करणे | जिल्हाधिकारी | ७ दिवस |
| ३ | शासनस्तरावरून कामे निश्चित झाली नसल्यास कामे निश्चित करणे | नगरपरिषद | २० दिवस |
| ४ | निश्चित केलेल्या कामांना सार्वजनिक बांधकाम विभाग/ जीवन विकास प्राधिकरणाकडून | कार्यान्वयन यंत्रणा | १ महिना |



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | तांत्रिक मान्यता प्राप्त करून घेवून प्रशासकीय मान्यतेस्तव जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव पाठविणे | | |
| ५ | प्रशासकीय मान्यता प्रदान करणे | जिल्हाधिकारी | २० दिवस |
| ६ | प्रशासकीय मान्यतेस्तव शासनास प्रस्ताव पाठविणे | कार्यान्वियन यंत्रणा | २० दिवस |
| ७ | प्रशासकीय मान्यता प्रदान करणे | राज्य शासन | २० दिवस |
| ८ | निविदा प्रसिद्ध करणे | कार्यान्वियन यंत्रणा | २० दिवस |

(ब) शासन स्तरावरून मंजूर झालेला निधी उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या मुदतीत नगरपरिषदांना वितरीत करणे आवश्यक आहे.सबब,प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावाकरीता निधी जिल्हास्तरावर प्रलंबित ठेवण्यात येवू नये.

(क) सदर योजनेअंतर्गत वितरीत करण्यात येणा-या निधीचे अनुषंगाने उपरोक्त मुदतीत कार्यवाही होणे अपेक्षित आहे.सबब,नगरपरिषदांनी कामे निश्चित करणे/तांत्रिक मान्यता घेणे याबाबत जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी आढावा घ्यावा.

NOTARY V.L.SHINDE AREA KOREGAON DIST. SATARA R.No.7767 Govt. Of. India

## ११. निधी मंजूरीची मर्यादा :-

(अ)उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद , पात्रतेचे निकष, मागणीचे प्रस्ताव, कामांचे स्वरूप इत्यादी बाबी विचारात घेवून नगरपरिषदनिहाय निधी मंजूरीची मर्यादा निश्चित करण्यात येईल.

(ब)एखाद्या प्रस्तावाची तांत्रिक/प्रशासकीय मान्यता जास्त किंमतीची असल्यास सदर प्रकल्पाकरीता टप्प्या-टप्प्याने निधी वितरीत करण्यात येईल.

## १२. योजनेच्या अन्य अटी व शर्थी -

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची



Scanned with CamScanner

खातरजमा करणे. हाती घ्यावयाची कामे सर्वसाधारणपणे नागरीकांच्या ठळकपणे लक्षात येतील किंवा नागरीकांना त्या कामांचा स्पष्ट बोध होईल अशा स्वरुपांच्या कामांनाच प्राधान्य देण्यांत यावेत.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

(ड) पायाभूत सुविधाअंतर्गतच्या कोणत्याही कामांची दुरूक्ती होणार नाही याबाबतची दक्षता घेण्यात यावी.



Scanned with CamScanner

१३. **योजनेचे लेखाशिर्ष -**

(अ) विभागाच्या मंजूर नियतव्ययातून होणा-या कर्चाच्या बाबतीत -

यासंबंधीचा खर्च मागणी क्र. एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७, नगर विकास, ८०, सर्वसाधारण, १९२, नगरपरिषदांना सहाय्य, (००) (४२) नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान (वेतनेतर) , ३१ , सहायक अनुदाने (वेतनेतर) , (२२१७ १३०१), या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतुदीमधून भागविण्यात येईल.

(ब) नियोजन विभागाकडून उपलब्ध करून देण्यात येणारा अतिरीक्त नियतव्ययाच्या बाबतीत-

यासंबंधीचा खर्च मागणी क्र. एफ-५, मुख्य लेखाशिर्ष ४२१७, नगरविकासावरील भांडवली खर्च, ८०, सर्वसाधारण, १९२, नगरपरिषदांना सहाय्य, (००) (०८) नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान, (४२१७ ०६०३), ३१, सहाय्यक अनुदान या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतुदीमधून भागविण्यात येईल.

NOTARY
V.L.SHINDE
AREA
KOREGAON
Dist.SATARA
R.No.7767
Govt.Of.India

१४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१११७१७१६०८५४२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vivek Shankar Kumbhar

Digitally signed by Vivek Shankar Kumbhar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ef935067920760fbaec2fa421af2eac23d3b5737b99088 3bc0d6ef293ba28a2f, serialNumber=5e3716fd0fe61ee87305882bc35ee7e757293849e74351e2ab33e4eb40bfb646, cn=Vivek Shankar Kumbhar
Date: 2017.11.17 18:12:28 +05'30'

(विवेक कुंभार)
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय , मुंबई-३२
३. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय , मुंबई-३२



Scanned with CamScanner

४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,वरळी, मुंबई-१८

५. सर्व विभागीय आयुक्त

६. सर्व जिल्हाधिकारी

७. सर्व आयुक्त, महानगरपालिका

८. मा.राज्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव

९. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,

१०. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,

११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

१२. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.

१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

१५. सर्व जिल्हा प्रशासन अधिकारी

१६. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.

१७. सर्व कार्यासने, नगर विकास विभाग-२, मंत्रालय , मुंबई-३२

१८. कार्यासन नवि-४ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१९. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned with CamScanner

Annexure VIII

पुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी पूररेषेच्या आत कोणतेही बांधकाम न होण्याच्या दृष्टिने पूररेषेची आखणी करणे व निषिद्ध व नियंत्रित क्षेत्राचा उपयोग करण्याबाबत मार्गदर्शक सूचना

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग,**
**शासन परिपत्रक क्र पूरनि-२०१८/(१८२/२०१८) सिं.व्य.(महसूल )**
मंत्रालय, मुंबई ४०००३२,
दिनांक:-३ मे, २०१८

**वाचावे :-** शासन परिपत्रक क्र.एफडीडब्लु १०८९/२४३/८९/ सिं.व्य.(कामे), दि. २.०९.१९८९,
दि.२१.९.१९८९

**प्रस्तावना :-**

पाटबंधारे विभाग शासन परिपत्रक क्र एफडीडब्लु १०८९/२४३/८९/ सिंव्य (कामे) दि.२.९.१९८९ व दि.२१.९.१९८९ अन्वये पुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी पूररेषेच्या आत कोणतेही बांधकाम न होण्याच्या दृष्टीने पूररेषेची आखणी करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

नदीच्या निळया पूररेषेच्या आत निषिध्द क्षेत्रात व लाल पूररेषा व निळी पूर रेषा यांच्यामधील नियंत्रित क्षेत्रात शहरांच्या ,गावांच्या, तिर्थक्षेत्र विकासाच्या दृष्टीने नदीवर पूल बांधणे,पूलाचे दोन्ही बाजूने पोहोच रस्ते तयार करणे, शहराच्या विकास आराखडयानुसार नदीच्या बाजूने जाणारे रस्ते, उद्याने व जॉगींग ट्रॅक तयार करणे तसेच पूरसंरक्षक कामांतर्गत नदीच्या तीरालगत पूर संरक्षक भिंत बांधणे,घाट बांधणे या शिवाय गॅस पाईपलाईन क्रॉसिंग करणे ,विद्युत वाहिनी क्रॉसिंग करणे, नदीच्या कडेने ड्रेनेज पाईप लाईन टाकणे,मल:निसारण प्रकल्पाचे काम करणे, इ. प्रकारच्या सार्वजनिक स्वरुपाच्या अपरिहार्य कामांसाठी संबंधित शासकीय / निमशासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था कडून ना-हरकत प्रमाणपत्रांची वाढती मागणी, जलसंपदा विभागामार्फत राज्यातील विविध नदीनाल्यांवर पूर्ण झालेल्या प्रकल्पांची संख्या व बांधकामाधीन प्रकल्पांची संख्या ,काळानुरुप बदललेले पर्जन्यमानाचे स्वरुप, पूरनियंत्रण व पुराचे अंदाज वर्तवण्याबाबत उपलब्ध अत्याधुनिक यंत्रणा इत्यादी गोष्टींचा एकत्रित पणे विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

शासन परिपत्रक क्र न्यायप्र -२०१४ प्र.क्र.४२४/२०१४ सिंव्य (म), दि.२.३.२०१५ , अन्वये जलसंपदा विभागामार्फत पूरक्षेत्र व पूररेषा नकाशे व आराखडयांना मान्यता देण्यात येते. तथापि पाटबंधारे विभाग शासन परिपत्रक क्र एफडीडब्लु १०८९/२४३/८९/ सिंव्य (कामे), दि.२.९.१९८९ व दि.२१.९.१९८९ अन्वये नदीच्या निळया पूररेषेच्या (Blue Line) आत निषिध्द क्षेत्रात (Prohibitive Zone) आणि लाल पूररेषा(Red Line) व निळी पूर रेषा(Blue Line) यांच्यामधील नियंत्रित क्षेत्रात(Restrictive Zone) सार्वजनिक सुविधांच्या दृष्टीने आवश्यक नेमकी कोणती अपरिहार्य कामे घ्यावीत याबाबत अधिक स्पष्टता आणण्याच्या दृष्टीने सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यादृष्टीने एकत्रित सुधारित / अद्ययावत सूचनांचा समावेश करुन आता खालील प्रमाणे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

NOTARY V.L.SHINDE AREA KOREGAON SATARA

Scanned with CamScanner

**परिपत्रक -**

१. पाटबंधारे विभाग शासन परिपत्रक क्र एफडीडब्लु १०८९/२४३/८९/ सिंव्य (कामे) दि.२.९.१९८९ व दि.२१.९.१९८९ अद्ययावत करण्यात येत आहे.

२. पूरक्षेत्रातील जमिनीच्या वापराबाबत धरण सुरक्षितता संहिता ( Dam safety Manual) प्रकरण ८/१९८४ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे महत्वाच्या पूररेषा हया मुख्यत्वेकरुन दोन प्रकाराच्या आहेत. निषेधक पूररेषा ( Blue Line) व नियंत्रक पूररेषा ( Red Line) .

३. निळी पूररेषा (Blue Line) :-

निळी पूररेषा (Blue Line) ही खालीलपैकी येणाऱ्या जास्तीत जास्त विसर्गाच्या पाणी पातळीला आखलेल्या रेषेला संबोधण्यात यावी.

अ) सरासरीने २५ वर्षातून एकदा (१ in २५ year) या वारंवारीतेने (Frequency) येणारा पूर विसर्ग

किंवा

ब) प्रस्थापित नदीपात्राच्या विसर्गक्षमतेच्या दिडपट विसर्ग.

४. लाल पूररेषा (Red Line) :-

लाल पूररेषा (Red Line) ही खालीलपैकी येणाऱ्या विसर्गाच्या पाणी पातळीला आखलेल्या रेषेला संबोधण्यात यावी.

अ) ज्या भागात धरण नसेल तेथे :- सरासरीने १०० वर्षातून एकदा (१ in १०० year) या वारंवारीतेने (Frequency) येणारा पूर विसर्ग.

ब) ज्या भागात धरण असेल तेथे :- प्रकल्पाच्या संकल्पनातील सांडव्यावरून वाहणारा संकल्पित महत्तम पूर विसर्ग अधिक धरणाखालील पाणलोट क्षेत्रातून येणारा अपेक्षित १०० वर्षातून येणारा (१ in १०० year) या वारंवारीतेने (Frequency) येणारा पूर विसर्ग.

५. निषिध्द क्षेत्र (Prohibitive Zone) :-

नदीच्या उजव्या तीरावरील निळी पूर रेषा (Blue Line) ते नदीपात्र ते डाव्या तीरावरील निळी रेषा (Blue Line) या मधील क्षेत्राला निषिध्द क्षेत्र (Prohibitive Zone) म्हणून संबोधण्यात यावे.

६. नियंत्रित क्षेत्र (Restrictive Zone) :-

नदीची निळी पूररेषा (Blue Line) ते त्याच तीरावरील लाल पूररेषा (Red Line) यामधील क्षेत्राला नियंत्रित क्षेत्र (Restrictive Zone) संबोधण्यात यावे.

७. निषिध्द क्षेत्राचा (Prohibitive Zone) उपयोग फक्त मोकळया जमिनीच्या स्वरुपात उदा. उदयाने, खेळाची मैदाने किंवा हलकी पिके घेणे , ज्याठिकाणी पिके घेण्याचा हक्क पारंपारिक वापरामुळे प्रस्थापित झाला आहे अशा ठिकाणी (उदा. नदीपात्राजवळ करण्यात येणारी कलींगड / टरबूज / खरबूज इ.ची लागवड सार्वजनिक शौचकूप व मल:निस्सारण सुविधा ) अशा सारख्या कारणांसाठीच केला जावा की जेणे करुन नदी प्रवाहात कोणताही अडथळा येणार नाही , नदीची वहनक्षमता कमी होणार नाही व नदीच्या काटछेदात कोणताही बदल होणार नाही .



Scanned with CamScanner

८. नियंत्रक क्षेत्राचा (Restrictive Zone) उपयोग खालील कारणांसाठीच केला जावा .

i) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक व अपरिहार्य मल:स्सारण योजना .

ii)सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक व अपरिहार्य सार्वजनिक रस्ते की जेणेकरुन सदर रस्त्याची माथा पातळी निळया पूररेषा पातळीच्या वर असेल. सदर पातळी किती वर असावी याची निश्चिती संबंधित Indian Road Congress Code मधील तरतुदींनुसार करावी.

iii) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक व अपरिहार्य पाणीपुरवठा पाईपलाईन,गॅस पाईप लाईन , ड्रेनेज पाईपलाईन की जेणेकरुन सदर पाईप लाईन भूमिगत असावी व त्यामुळे नियंत्रित क्षेत्रातील नदीच्या काटछेदात कोणताही अडथळा येऊन त्यात बदल होणार नाही.

iv) नियंत्रित क्षेत्रातील बांधकामांच्या तळमजल्याच्या जोत्याची पातळी लाल पूररेषा पातळीच्या वर सुरक्षित उंचीपर्यंत असावी की ज्यामुळे पूरपातळी नियंत्रक क्षेत्रात जास्त वाढण्यापूर्वी तेथील नागरिकांना सुरक्षितस्थळी सहजपणे जाता येईल तसेच या क्षेत्रामध्ये येणारा संभाव्य पूर व तसेच पुरामुळे होणारी जिवित हानी व मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी हया क्षेत्रातील लोकांना, जनावरांना व वस्तुंना अल्पावधीची पूरसूचना मिळताच हे क्षेत्र तातडीने सोडून सुरक्षित स्थळी जाणे शक्य होईल.

९. उपरोक्त मुद्दा क्र. ८ मध्ये नमूद उपयोगामुळे नदी प्रवाहात कोणताही अडथळा येणार नाही , नदीची वहनक्षमता कमी होणार नाही व नदीच्या काटछेद-क्षेत्रात कोणताही बदल होणार नाही , याची दक्षता घेण्यात यावी . प्रवाहाला अडथळा आणणारे बांधकामाविरुध्द मुख्य अभियंता कारवाई करण्यास सक्षम असतील. निषिध्द (Prohibitive Zone) व नियंत्रित क्षेत्रात (Restrictive Zone) करावयाच्या सदर सार्वजनिक कामांच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी संबधित विभागाची / स्थानिक स्वराज्य संस्थेची असेल व संभाव्य पुरामुळे होणाऱ्या जिवीत व वित्त हानीस संबधित विभाग/ स्थानिक स्वराज्य संस्था जबाबदार राहील व त्याअनुषंगाने उद्भवणाऱ्या न्यायालयीन प्रकरणास संबधित विभाग / स्थानिक स्वराज्य संस्था जबाबदार असेल.

१०. वरील बाबींचा विचार करुन पुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी व निषिध्द व नियंत्रित क्षेत्राची निश्चिती करण्याच्या दृष्टीने आवश्यक पूररेषा आखून देण्याबाबत जलसंपदा विभागाकडे जिल्हाधिकारी , स्थानिक स्वराज्य संस्था अथवा अन्य विभागाकडून मागणी प्राप्त झाल्यास जलसंपदा विभागाच्या संबधित क्षेत्रिय मुख्य अभियंता यांनी शासन परिपत्रक क्र न्यायप्र -२०१४ प्र.क्र.४२४/२०१४ सिंव्य (म), दि.२.३.२०१५ अन्वये कार्यवाही करावी.

११. जलसंपदा विभागाचे कार्यक्षेत्र नदी किनारी पूररेषेची आखणी करण्याइतपतच मर्यादित असल्याने निषिध्द क्षेत्रातील व नियंत्रित क्षेत्रातील उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेली सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अपरिहार्य व आवश्यक कामांना जलसंपदा विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता राहणार नाही .



Scanned with CamScanner

तथापि, पर्यावरण विभाग/ इतर विभाग/ स्थानिक संस्था/ इतर शासकीय विभाग यांची वैधानिक मान्यता आवश्यक असेल तर ती स्वतंत्रपणे घेण्यात यावी.

१२. सदर शासन परिपत्रक विधी व न्याय विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ३८८-२०१८/E दि.१३.४.२०१८ व नगरविकास विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. टिपीएस -१०१८/अनौस.५/२०१८/ नवि -९ दि.१९.४.२०१८ नुसार निर्गमित करण्यात येत आहे .

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०३१८०१५९५७२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

C. A. Birajdar

Digitally signed by C. A. Birajdar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bf1b26f0a8f1d09e25cd9d6bf37b84d8e843d220d272af12bd94b7eee717c5fa, cn=C. A. Birajdar
Date: 2018.05.03 18.06.32 +05'30'

**(च.आ.बिराजदार)**
सचिव (लाक्षेवि)

**प्रत :-** मा. राज्यपाल यांचे सचिव,

१. मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय,
२. मा.अध्यक्ष / उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई,
३. मा.सभापती / उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मंबई,
४. मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई, यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, मुंबई, यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई,
६. मा. मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. महालेखापाल १ / २ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
९. महालेखापाल १ / २ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
१०. अ.मु.स (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. अ.मु.स (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. अ.मु.स. (पर्यावरण) यांचे स्वीय सहायक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. प्रधान सचिव (नगरविकास) यांचे स्वीय सहायक, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. सचिव (जसंव्य व लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. सचिव (प्रकल्प समन्वय) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१९. सर्व महासंचालक, जलसंपदा विभाग,



Scanned with CamScanner

२०. सर्व विभागीय आयुक्त, महसूल विभाग, महाराष्ट्र राज्य,
२१. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य,
२२. सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग,
२३. संचालक, नगररचनाकार, पुणे,
२४. सर्व मुख्य अभियंता/मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, जलसंपदा विभाग,
२५. जलसंपदा विभागातील सर्व सहसचिव व उपसचिव, मंत्रालय, मुंबई,
२६. सर्व अधीक्षक अभियंता/अधीक्षक अभियंता व प्रशासक, जलसंपदा विभाग,
२७. ग्रंथालय, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
२८. सिं.व्य. (महसूल) कार्यासन, संग्रहार्थ,

NOTARY
V.L.SHINDE
AREA
KOREGAON
Dist.SATARA
R.No.7767
Govt. Of. India



Scanned with CamScanner